# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.३/२०२४** **दिनांक १४/०२/२०२४**

**स्थळ- साई निवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सायं.४.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची दि.०७.०२.२०२४ रोजी अहमदनगर येथे मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आलेली सभा तहकूब करुन बुधवार दि.१४.०२.२०२४ रोजी सायं. ४.०० वा. शिर्डी येथील संस्थानचे साई निवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३९२९/२०२४, दि.०७.०२.२०२४ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **बुधवार दि.१४.०२.२०२४ रोजी सायं.४.०० वा. साई निवास अतिथीगृह, शिर्डी** येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर,भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१ दि.११.०१.२०२४ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.८८ दि.११.०१.२०२४ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२ नवीन श्री साईबाबा दर्शनरांग इमारतीमध्ये श्री साईबाबांचे विविध मुद्रेतील ०४ लाईव्ह मुर्ती देणगी स्विकारण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.८९ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.३ श्री साईप्रसादालय इमारतीचे छतास असलेल्या कौलारू डोमचे नुतनीकरण व वॉटरप्रुफिंग करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रु.४८,००,७०६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९० प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४ लाडू प्रसाद निर्मिती विभागाकरिता अन्नदान कक्षाचे पहिल्या मजल्यावर पत्राशेड उभारणी करणे व त्यासाठी आवश्यक लिफ्ट व जिना करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रु.८९,७८,०००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९१ सोलर पॅनल व सोलर ड्रायर यांचा अंतर्भाव करुन प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५ नवीन श्री साईबाबा दर्शनरांग इमारतीमध्ये साईभक्तांचे सुविधेकरीता अतिरिक्त व्यवस्था निर्माण करणेसाठी येणारे रक्कम रु.३९,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९२ सुधारीत रक्कम रु.२७,६०,०००/- चा प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६** **संस्थान कर्मचारी यांचेकरिता साईनिवास व सुलभ शौचालयाचे मधील व पाठीमागील जागेत टु व्हीलर पार्कींग व्यवस्था करणे व पूर्व बाजुकडील हद्दीवरील कम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९३** प्रस्ताव मंजुर.

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.७** **श्री साईबाबा संस्थान मार्फत नव्याने लेजर शो (Light & Sound Show)प्रकल्प BOT (Build – Operate-Transfer) तत्वावर उभारणेसाठी सल्लागार Rhino Engineers Pvt.Ltd., Ahmadabad व श्री नितीन कुलकर्णी यांचे सादरीकरण पाहून सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.९४** तहकुब. **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.८** **श्री साईबाबा हॉस्पीटल एम.आर.आय. विभागाचे समोर रुग्ण व रुग्णांचे नातेवाईकांचे ऊन, वारा व पाऊसापासून संरक्षण होणेसाठी कायमस्वरुपी टेंसाईल फॅब्रीकचे शेड उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.९५** बैठक व्यवस्थेच्या खर्चासह नवीन प्रस्ताव सादर करावा. **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.९** **श्री साईबाबा समाधी मंदिर परिसरातील इमारती तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय यांचे दुरुस्ती व नुतनीकरण करणेसाठी प्राप्त प्रस्तावांपैकी निम्नतम दरधारक आर्किटेक्ट Ar. Rajendra Gattani & Associates, Akole, Amravati यांचे दर स्विकारणेबाबत.**

**निर्णय क्र.९६** प्रस्ताव मंजुर. **(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१०** **जुना पिंपळवाडी रोडवरील पॉलीकोर्बोनेट शिट शेड काढून साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंगच्या जागेमध्ये पुर्नःउभारणी करणेस तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९७** तहकुब. **(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

विषय नं.११ दि.०१.०४.२०२४ ते दि.३१.०३.२०२५ या एक वर्ष कालावधीकरीता संस्थानचे १०८ वाहनांचा विमा नुतनीकरण करणेकामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस व याकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.९८ मागील वर्षीच्या कार्यवाही प्रमाणे प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही-वाहन विभाग)

---

विषय नं.१२ विभागीय चौकशी अधिकारी यांचे नेमणूकीबाबत.

निर्णय क्र.९९ तहकुब.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१३ अनुकंपा प्रतिक्षासुचीवरील पात्र कुटुंबियांना गट ‘क’ व गट ‘ड’ चे पदांवर संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत.

निर्णय क्र.१०० प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.१४ मा.ना.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांचेकडील एस.एल.पी.नं.२३६८३/२०२३ दि.०३/११/२०२३ रोजीचे आदेशाप्रमाणे पर्यायी जागा मिळणेबाबत श्रीमती फातिमाबी बक्षु शेख व इतर ४ रा. शिर्डी, ता राहाता यांचा दि.३०/११/२०२३ रोजीचा अर्ज.

निर्णय क्र.१०१ लायन्ससी तत्वाने जागा देणेसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्थळ पाहणी करुन प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

विषय नं.१५ संस्थानचे पिंपळवाडी रोड लगतचे जनरेटर रुम शेजारील मोकळया जागेत मोबाईल कॅमेरा क्लोकरूम सुरू करण्यास परवानगी मिळणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडीट को-ऑफ सोसायटी लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/२१७/२०२४ दि.०९.०१.२०२४.

निर्णय क्र.१०२ तहकुब.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१६** **नवीन दर्शनरांग इमारतीमध्ये साईभक्तांचे सोईसाठी व सेवेसाठी तळमजल्यावरील गाळा मिळणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडीट को- ऑफ सोसायटी लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/२१८/२०२४ दि.०९.०१.२०२४.**

**निर्णय क्र.१०३** **तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१७** **नवीन दर्शनरांग इमारतीत पाणी व थंडपेय विक्री स्टोअर चालविण्यास परवानगी मिळणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉइज क्रेडीट को-ऑफ सोसायटी लि. शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/२१९/२०२४ दि.०९.०१.२०२४ रोजीचे पत्र.**

**निर्णय क्र.१०४** **तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८** **साईभक्त कै.दगडू (भाऊ) गायके या नावामध्ये त्यांच्या वडीलांचे नाव समाविष्ट करणेबाबत साईभक्त कै.दगडू (भाऊ) गायके यांचे वशंज (श्री.बाबुराव गंगाधर गायके व इतर,रा.शिर्डी) यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१०५** **तहकुब.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१९** **M/s. Oracle Corporation यांचेमार्फत Oracle Database व Oracle ERP या प्रणालीचे कार्यान्वीत Licenses चे नुतनीकरण करून घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१०६** **प्रस्ताव मंजुर. नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन डेमो घेण्यात यावा व तो यशस्वी ठरल्यास प्रस्तावीत देय रकमेतुन रक्कम रुपये आठ लाख वजा करण्यात यावी. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग/विधी विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२०** **'साईटेक प्रकल्प-२' अंतर्गत मे.टिसीएस यांचेमार्फत प्राप्त प्रस्तावित अद्ययावतीकरण (संगणके व नेटवर्क) प्रस्तावासंदर्भात नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१०७ मे.टिसीएस यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये यु.पी.एस. चा समावेश करण्यात यावा. नोंद घेतली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२१ नवीन दर्शनरांग प्रकल्पाकरीता कॅन्टीन विभागासाठी स्टेनलेस स्टील टी जार खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१०८ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२२ नवीन दर्शनरांग प्रकल्पाकरीता कॅन्टीन व फायर अॅन्ड सेफ्टी विभागासाठी फर्निचर खरेदीकामी ई-निविदा व GeM निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१०९ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२३ नवीन दर्शनरांग प्रकल्पाकरीता आरोग्य विभागासाठी स्वच्छता साहित्य मशिनरी खरेदीकामी ई-निविदा व GeM निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.११० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२४ नवीन दर्शनरांग प्रकल्पाकरीता आरोग्य विभागासाठी स्वच्छता साहित्य खरेदीकामी ई-निविदा व GeM निविदा प्रक्रियेतील न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.१११ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**विषय नं.२५ आर्थिक वर्ष २०२३-२४ चे सुधारित अंदाजपत्रक व आर्थिक वर्ष २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११२ अभ्यासपुर्वक सविस्तर खुलाशासह प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२६ माहे जुलै व ऑगस्ट २०२३ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.११३ नोंद घेतली. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२७ दक्षिणापेटीतील रक्कम मोजणीचे कामासाठी देण्यात येत असलेल्या विशेष मेहनतानाच्या रकमेत वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.११४ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.२८ सन २०२४-२५ करीता किराणा माल, गाईचे शुध्द तूप, दुध, पॅकेज्ड ड्रिकिंग वॉटर, पेपर पिशवी व इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११५ प्रस्ताव मंजुर. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.**

**(कार्यवाही-भांडार विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.२९ संस्थान प्रकाशीत श्री सद् गुरू साईनाथ सगुणोपासना आरतीचे विविध प्रादेशिक भाषेतील पुस्तके नविन दर्शन रांगेतील आरती प्रतिक्षा हॉलमध्ये साईभक्तांना उपलब्ध करून देणेबाबत.**

**निर्णय क्र.११६ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.३० संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या श्री साईबाबा दिनदर्शिका -२०२४ वाढीव छपाईकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.११७ प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

विषय नं.३१ साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर (ब्लॅकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेकामीचे ई-निविदेचा कालावधी सन २०२३-२४ ऐवजी दुरुस्ती करुन सन २०२४-२५ होणेबाबत.

निर्णय क्र.११८ प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)

---

विषय नं.३२ साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील जुन्या फायबर फोम टु फोल्ड मॅट्रेस व क्वायर मॅट्रेस फोम गाद्यांची जाहीर लिलावाने विक्री करणेकामी करावयाच्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.११९ प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास)

---

विषय नं.३३ साईआश्रम भक्तनिवास विभागाकरिता पुनर्प्रत्ययी पध्दतीने प्रिंटेड बेडशिट उशीकव्हरसह मंजूर दराने खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१२० प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास)

---

विषय नं.३४ साई धर्मशाळा व साईआश्रम भक्तनिवास या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे व फॉगींग ट्रिटमेंट (धुरीकरण) करणेकामी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून ई-निविदा प्रकिया राबविणेस व येणा-या अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१२१ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-साई धर्मशाळा)

---

विषय नं.३५ बेडशीट उशीकव्हरसह खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.१२२ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-साई प्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघ स्थापन करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२३ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.३७** **श्री साईबाबा हॉस्पीटलमधील जिवनदायी आरोग्य योजनेचे विशेष लेखापरिक्षण अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.१२४ तहकुब.** **(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजुर उपचार दरातील व संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.१२५ मुद्दा क्र.१ मध्ये कोणतीही रक्कम कपात न करता पहिल्या रुग्णापासून प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, या दुरुस्तीसह प्रस्ताव मंजुर. सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करावे.**
**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**विषय नं.३९** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबींतांचा वैद्यकीय बिलांचा परतावा रक्कम रु.९,०३,८१७/- मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२६ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४०** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबींतांचा वैद्यकीय बिलांचा परतावा रक्कम रु.९,१२,६९०/- मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२७ प्रस्ताव मंजुर.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४१** **श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोंबर-२०२३ ते डिसेंबर-२०२३ अखेर वैद्यकीय उपचार व औषधांसाठी झालेल्या रक्कम रु.२,८६,९१,३८०/-च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१२८ नोंद घेऊन मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा
विषय नं.१ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. सिव्हील ॲप्लीकेशन नं.८७०७२०२३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०९.११.२०२३ रोजी केलेल्या आदेशानुसार ३१ आक्टोंबर, २०२३ अखेर सलग १० वर्ष पुर्ण झालेले कंत्राटी कर्मचारी यांची सेवाजेष्ठता यादी तसेच मयत, सेवानिवृत्त, सोडून गेलेले कंत्राटी कर्मचारी यादी व आस्थापना विभागाने तयार करुन दिलेला आकृतीबंध विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेबाबत.

निर्णय क्र.१२९ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२ सन २०२३-२४ करीता आरोग्य विभागाकडील नवीन दर्शनरांग कॉम्पलेक्स मधील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंगची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.१३० प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही-आरोग्य विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.३ संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने चांदी वस्तु कस लावून तपासणी करुन बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चीत करणेकामी पुर्वीचे सोने-चांदी मुल्यांकनकार श्री.वडनेरे यांना पुन:श्च घेणेबाबत.

निर्णय क्र.१३१ प्रस्ताव मंजुर.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.४ सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूक करणे व येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१३२ चर्चा झाली. झालेल्या चर्चेप्रमाणे सुधारीत प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५ माहे सप्टेंबर-२०२३ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१३३ नोंद घेतली. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६ शांतीनिकेतन इमारतीचे नुतनीकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.१३४ तहकुब. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारतीचे दक्षिण-पश्चिमेकडील बाजुस बसची प्रतिक्षा करणारे साईभक्तांचे उन, वारा व पाऊसापासून संरक्षण होणेसाठी कायमस्वरुपी टेंन्साईल फॅब्रीकचे शेड उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.१३५ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८ मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्पाचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲन्ड कन्सलटंट प्रा.लि. पुणे यांचे अंतिम बील व निविदेपेक्षा जादा झालेले कामाबाबत.**

**निर्णय क्र.१३६ या प्रकल्पाचे सल्लागार श्री.डी.ओ.निकम यांना ऐकले. तहकुब.**
**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.९ श्री साईबाबा संस्थान, कनकुरी, पिंपळवाडी संयुक्त पाणी पुरवठा योजनेच्या पिंपळवाडी पाईप लाईन करीता मोटार बसविणेसाठी मा.सरपंच, ग्रामपंचायत, पिंपळवाडी यांनी केलेल्या मागणी बाबत.**

**निर्णय क्र.१३७ व्यवहार्यता अहवाल घ्यावा. (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१० श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील Tablet, Injection, Syrup, Ointment, Drop करीता दुस-यांदा राबविण्यात आलेल्या फेर ई-निविदेत दर प्राप्त न झाल्याने दर निश्चीती (Rate Contract) करणेकामी तातडीने कोटेशन मागविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१३८ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११ सन २०२४-२५ या एक वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंन्ट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविद प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१३९ प्रस्ताव मंजुर. (कार्यवाही-साईबाबा भक्तनिवासस्थान)**

----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२ शैक्षणिक वर्ष २०२३-२४ इयत्ता १ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम,२००९ (RTE Act-2009) अन्वये इयत्ता १ली चे नवीन प्रवेशानुसार २५ टक्के प्रमाणे ५९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१४० प्रस्ताव मंजुर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)**

----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३ सन २०२४-२५ करीता श्री साई प्रसादालय अ) हाऊसकिपींग / स्वच्छता, पेस्ट कंट्रोल करणे, वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणे, ब) अन्न पाकिटे बनविणेकामी क) स्वामी नारायण चपाती बनविणेकामी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.१४१ प्रस्ताव मंजुर. सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करावे.**
**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ कर निर्धारण वर्ष २०२०-२१ चे आयकर विभागाकडून प्राप्त झालेल्या कर परतावा (Tax Refund) रकमेची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.१४२ नोंद घेतली. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ उन्हाळयाचे कालावधीत तसेच श्री रामनवमी उत्सव -२०२४ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी निविदाधारक साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापुर यांची रु.४६,००,०००/ मात्रची निम्नतम दराची ई-निविदा स्विकारणेबाबत.**

**निर्णय क्र.१४३ वाटाघाटीनंतर ठरलेली रक्कम +१० टक्केच्या आत असल्याने प्रस्ताव मंजुर.**
**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.८८ ते १४३ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ०६.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**(सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**